# प्रेसनोट

दि.२०/०७/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | संगमनेर शहर पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)सुनिल पोपट पर्बत, वय–४० वर्ष, धंदा–नोकरी, व्यवस्थापक, प्रथमेश इलेक्ट्रिकल कंपनी, संगमनेर रा.निंबाळे, ता.संगमनेर, जि.अहमदनगर<br>२)श्रीमती सुजाता तेजेश कांबळे, वय–३३ वर्ष, धंदा–नोकरी, लिपीक,प्रथमेश इलेक्ट्रिकल कंपनी, संगमनेर रा.छगन पगारे यांचे घरी भाडयाने, मालदाड रोड, संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ३,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हे प्रथमेश इलेक्ट्रिकल कंपनी संगमनेर यांचेकडे नेमणुकीस असून, त्यांना सदर कंपनीकडून उप अभियंता, म.रा.वि.वितरण कंपनी, संगमनेर (शहर) विभागात बाहयस्त्रोत कर्मचारी म्हणून सप्टेंबर २०१८ पासून नेमण्यात आलेले आहे. प्रथमेश इलेक्ट्रिकल कंपनी ही शासनाकडे नोंदणीकृत कंपनी आहे. तक्रारदार यांचे म.रा.वि.वि. कंपनीकडून प्रत्येक महिन्याचे वेतन प्रथमेश इलेक्ट्रिकल कंपनीकडे वर्ग केले जाते. प्रथमेश इलेक्ट्रिकल कंपनी मधील आरोपी नं.१)सुनिल पोपट पर्बत, व्यवस्थापक व आरोपी नं.२)श्रीमती सुजाता तेजेश कांबळे, लिपीक हे तक्रारदार यांचे जून महिन्याचे वेतन त्यांचे बॅक खात्यामध्ये जमा करणेसाठी रु.३०००/– ची मागणी करत असले बाबतची तक्रार, तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर यांचेकडे दिली. त्यांचे तक्रारीचे अनुषंगाने आज दि.२०/०७/२०२२ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी नं.१ पर्बत व आरोपी नं.२ श्रीमती कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे जून महिन्याचे वेतन बॅक खात्यामध्ये जमा करण्यासाठी पंचासमक्ष रु.३०००/– ची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन आज दि.२०/०७/२०२२ रोजी प्रथमेश इलेक्ट्रिकल कंपनी कार्यालयात लाचेचा सापळा आयोजित केला असता आरोपी नं.२ श्रीमती कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष रु.३०००/– लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. तसेच आरोपी नं.१ सुनिल पर्बत यांना सुध्दा ताब्यात घेण्यात आले आहे. सदर बाबत संगमनेर शहर पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर